**फौजदारी चौकशी अर्ज क्र.२२/२०२३**

सृष्टी कांबळे व २ वि. स्वप्नील कांबळे व इतर

CNR No. MHRG090001062023

**<u>नि.क्र.०५ वरील आदेश</u>**

**<u>(दिनांक ०३/१०/२०२४ रोजी पारित)</u>**

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाच्या कलम १८, १९ व २३ अन्वये अंतरीम आदेश, निवासी आदेश व संरक्षणात्मक आदेशासाठी दाखल केला असून तिचे म्हणणे खालीलप्रमाणे आहे.

०२. अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांचा हिंदू शास्त्र पद्धतीने दिनांक २९.११.२००९ रोजी मौजे वरसे, ता. रोहा येथे विवाह झाला.

०३. अर्जदार क्र.०१ चे कथन असे की, सामनेवाला क्र.०१ ते ०५ हे अर्जदारास त्यांचे लग्न झाल्यापासूनच मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास देत आहेत. सामनेवाला क्र.०१ ते ०३ हे दारुचे व्यसन करुन अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत तिला मारहाण व शिवीगाळ करतात. तसेच सामनेवाला क्र.०४ व ०५ या देखील अर्जदारास शिवीगाळ व मारहाण करतात. नाईलाजास्तव अर्जदार तिच्या दोन्ही मुलींसह सध्या सामनेवाला यांच्यापासून विभक्त राहत असून तिच्या आई–

वडीलांकडे वरसे, ता. रोहा येथे राहत आहे.

०४. अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांना कु. अनन्या, वय ११ वर्षे व कु. शरण्या, वय ०५ वर्षे अशी दोन अपत्ये असून त्या अर्जदार क्र.०१ च्या माहेरी तिच्या सोबत राहत आहेत. अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांच्यात कौटुंबिक वादविवाद झाल्यानंतर सामनेवाला क्र.०१ ने त्यांच्या मुलींकडे सतत दूर्लक्ष केले आहे. सामनेवाला क्र.०१ यास दारु व जुगार खेळण्याचे व्यसन असून तो कुटुंबाकडे लक्ष देत नाही.

०५. अर्जदार क्र.०१ ही तिच्या मुलीसह मु. वरसे, ता. रोहा येथे अर्जदाराच्या वडीलांकडे राहत असून अर्जदारास कायमस्वरुपी अशी निवासाची कोणतीही सोय नाही. सामनेवाला क्र.०१ हा धाटाव येथील युनीकेम कंपनीत यापुर्वी नोकरी करत होते. सद्यस्थितीत तो मुंबई येथे नोकरी करीत असून त्यांस अंदाजे दर महा रक्कम रु.२५,०००/- उत्पन्न मिळत आहे.

०६. अर्जदार क्र.०१ पुढे असे कथन करतात की, ती सध्या रोहा येथील डॉ. मेहता क्लिनीक यांच्याकडे खाजगी तात्पुरती दरमहा रक्कम रु.३,०००/- ची नोकरी करीत असून त्यातून मिळणा-या शुल्लक मोबदल्यातून व माहेरच्या आधारावर तिचा व मुलींचा उदरनिर्वाह करते. तिला इतर उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही.

शिवाय माहेरची आर्थीक परिस्थिती देखील हालाकीची आहे. सदरचा मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत काही कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यानच्या काळात तात्पुरत्या स्वरुपात सामनेवाला क्र.०१ याने दर महा रु.१५,०००/– उदरनिर्वाहाकरीता द्यावे ही विनंती केली आहे.

०७. सामनेवाला क्र.०१ स्वत तसेच वकीलांमार्फत न्यायालयात हजर राहुन देखील त्याने सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. सबब दिनांक ०१/०७/२०२४ रोजी नि.क्र.०१ वर आदेश करुन सदरचा अर्ज विना म्हणणे चालवीण्यात आला. तसेच सामनेवाला क्र. १ यास मालमत्ता विवरण प्रतिज्ञापत्र सांगुन देखील सामनेवाला याने मालमत्ता विवरणपत्र दाखल केलेले नाही.

०८. अर्जदार क्र.०१ यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. खालील मुद्दे विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| **क्र.** | **मूद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही महिलांचे घरगुती हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– एवढी अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |

| | |
|---|---|
| २. अर्जदार ही कलम १८ प्रमाणे संरक्षणात्मक आदेश मिळणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ३. अर्जदार ही कलम १९ प्रमाणे निवासाची सोय मिळणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ४. अर्जदार ही कलम २१ प्रमाणे मुलीचा कायमचा ताबा मिळणेस पात्र आहे काय ? | नकारार्थी. |
| ५. काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**:: कारणमिमांसा ::**

**<u>मुद्दे क्र.०१ व ०४ करीता :–</u>**

०९. अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि.२९.११.२००९ रोजी रोजी झालेला असून सामनेवाला यांनी अर्जदार व त्यांचा विवाह मान्य केलेला आहे. परंतू अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदार पुढे असे कथन करते की, ती तिच्या उदरनिर्वाहासाठी तिच्या वडीलांवर अवलंबून आहे.

१०. सामनेवाला क्र.०१धाटाव येथील युनीकेम कंपनीत यापुर्वी नाकरी करत होते. सद्यस्थितीत तो मुंबई येथे नोकरी करीत असून त्यांस अंदाजे दर महा

रक्कम रु.२५,०००/– उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे तिला दर महा रक्कम रु.१५,०००/– मिळावे असे कथन केले आहे.

११. अर्जदाराच्या कथनांवरुन अर्जदार तिच्या मुलीसह तिच्या वडीलांकडे राहत आहे. सामनेवाला यांनी अर्जदारास शारीरीक व मानसिक छळ केला आहे. याउलट सामनेवाला यांच्या अर्जातील कथनांवरुन अर्जदार तिच्या मर्जीने माहेरी राहत आहे. परंतु अर्जदार हिस सामनेवाला यांनी माहेरी निघून जाण्यास भाग पाडले अगर ती स्वतःहून माहेरी आली या सर्व बाबी दोन्ही बाजूंचा पुरावा आल्यानंतर सिध्द होणार आहेत.

१२. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, सामनेवाला क्र.०१ यास दारुचे व्यसन असून तो अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेतो. अर्जदार पुढे असे कथन करते की, ती व तिची मुलगी त्यांच्या उदरनिर्वाहासाठी तिच्या वडीलांवर अवलंबून आहे. सामनेवाला क्र.०१ धाटाव येथील युनीकेम कंपनीत यापुर्वी नोकरी करत होते. सद्यस्थितीत तो मुंबई येथे नोकरी करीत असून त्यांस अंदाजे दरमहा रक्कम रु.२५,०००/– उत्पन्न मिळत आहे असे कथन केले आहे.

१३. अर्जदाराने नि.क्र.०६ कडे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. सामनेवाला क्र.०१ यांनी त्यांचे स्थावर व जंगम मालमत्तेबाबत

प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. अर्जदाराने सामनेवाला हा महिन्याला किती कमावतो हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही.

१४. अर्जदार ही माहेरी वडीलांकडे राहत असल्याचे अर्जातील कथनांवरुन लक्षात येते की अर्जदाराने अर्ज दाखल केल्यापासून सामनेवाला याने तिला तिच्या घरी जावून किंवा बाहेर कोणत्याही प्रकारचा त्रास दिला हे अर्जदाराने नमूद केलेले नाही. अर्जदार ही तिच्या माहेरी सुरक्षीत आहे त्यामुळे सद्यस्थितीत कोणतेही संरक्षणात्मक आदेश देण्याची गरज नाही. त्यामुळे मुद्दा क्र. ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

१५. अर्जदार क्र.०१ ने अर्जदार क्र.०२ अनन्या कांबळे व अर्जदार क्र.०३ शरण्या कांबळे यांचा कायमचा ताबा तिच्याकडे रहावा अशी विनंती केलेली आहे. अर्जदार क्र.०२ व ०३ यांचा कायमचा ताबा कोणाकडे असला पाहिजे यासाठी अर्जदार क्र.०१ ने सक्षम न्यायालयाकडे मागणी करावी. त्यामुळे मुद्दा क्र. ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.

१६. अर्जदार ही सामनेवाला याची कायदेशिर पत्नी आहे त्यामुळे सामनेवाला अर्जदाराची जबाबदारी कोणत्याही परिस्थीतीमध्ये नाकारू शकत नाही. पत्नीची जबाबदारी घेणे हे सामने वाला याचे कर्तव्य आहे. सामनेवाला हा महिना रक्कम रु.२५,०००/– कमवतो हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल

केलेला नाही. परंतू अर्जदार क्र.०१ ते ०३ यांची संपूर्ण जबाबदारी ही सामनेवाला क्र.०१ ची आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.०१ हा अर्जदार हिस अंतरिम पोटगी देणे लागतो. त्यामुळे मी मुद्या क्र.१ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवून मुद्या क्र.२ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज (नि. क्र. ५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला क्र.०१ याने अर्जदार क्र.०१ हिस दरमहा रक्कम रु. २,५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) एवढी अंतरीम पोटगी अर्ज दाखल तारखे पासून ते मुळ अर्जाचा निकाल होईपर्यंत दयावेत.

३. सामनेवाला क्र.०१ ने अर्जदार क्र. ०२ अन्यना हिस दरमहा प्रत्येकी रक्कम रु.३,०००/- (अक्षरी रुपये तिन हजार मात्र) एवढी रक्कम आर्थिक अंतरिम सहाय्य अर्ज दाखल केलेपासून मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत दयावे.

४. सामनेवाला क्र.०१ ने अर्जदार क्र.०३ हिस दरमहा प्रत्येकी रक्कम रु.२,५००/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे मात्र) एवढी रक्कम आर्थिक अंतरिम सहाय्य अर्ज दाखल केलेपासून मूळ अर्ज निकाली लागेपर्यंत दयावे.

५. या आदेशाची प्रत अर्जदार क्र.०१ व सामनेवाला क्र.०१ यांना मोफत देण्यात यावी.

MEGHA CHANDRAKANT HASGE

Digitally signed by MEGHA CHANDRAKANT HASGE
Date: 2024.10.04 16:22:56 +0530

स्थळ : रोहा, (एम. सी. हासगे)

दि.०३.१०.२०२४ न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.